Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 8 | Sept - 2015

# मराठी संताचा मनोविचार




**विजय रेवजे**
ल.भा.पा. महिला महाविद्यालय, सोलापूर .

***सारांश :***

मानवी मन मोठे अगम्य असे आहे. हजारो वर्षापासून मानवी मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू आहे, पण त्यासंबंधी निश्चित विचार मांडता येत नाहीत. वारा आहे पण दाखविता येत नाही. प्राण आहे पण तळहतावर धरता येत नाही. त्याप्रमाणेच मानवी मनाचेही आहे, असे असले तरी मराठी संतानी मानवी मनाचे स्वरूप आपआपल्यापरीने जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना:**


संत ज्ञानदेवानी - मनसंबंधीचे चिंतन करताना म्हटले आहे.

म्हणोनि मन एक निश्चल राहील !
मन आम्हासी साह्य होईल !!

मानवी जीवनात सुख आणि आनंद मिळवायाचा असेल तर मनाला स्थिर ठेवले पाहिजे, मन स्थिर आणि शांत असेल तर आपल्या कार्यात यश मिळेल असे सांगतात. तर संत एकनाथ - मानवी मनाची चंचलता वर्णन करून सांगताना म्हणतात.

मनाजी पाटील देह गावचा !
विश्वास धरू नका त्याचा !!

मन मोठे चंचल आहे, त्याचा भरवसा धरू नका कारण त्याचा निश्चय केव्हा डळमळेल हे सांगता येत नाही.



संत एकनाथ प्रमाणेच संत तुकारामही म्हणतात

नाही निर्मल जीवन
जेथे काम करील साबण !!
जैसे चित्त शुध्द नाही
तेथे बोध करील काही !!

संत तुकारामानी मनासाठी 'चित्त' असा शब्द वापरला आहे. अशा या चित्ताला मनाला शुध्दता हवी आहे चित्त शुध्द असेल तरच - जीवनात सुख, समाधान प्राप्त होत. म्हणून,

संत राम दासही आपल्या - उपदेशात म्हणतात ज्ञ

मना मानसी दुःख आणू न को रे !

मना सर्वथा शोक चिंता नको रे !!

मानवी जीवनातील मनाचे महत्व रामदास सांगतात की, भय, शोक, दु:ख, याचा वारा मनाला लागू देवू नका कारण मनाला स्थिरचित्त ठेवले तरचकर्म सिध्दीस जाते. म्हणून मनाला शोक, दु:ख, भयाची बाधा होवू देवू नका असा उपदेश करतात.

मराठी संतानी ज्याप्रमाणे - मनाबद्दल आपणे विचार मांडले आहेत तदतच हिंदीतील महान संत कबीर ही म्हणतात.

'मन जिंका जग जिंका !
मन हो चंगा तो कठौती मे भी गंगा !!

संत कबीरानी वर्णन केल्याप्रमाणेच - मनाच्या पावित्र्यावस्था बाह्य वस्तूच्या पावित्र्यतेवर अवलंबून असते.

मराठी हिंदी संतकवी प्रमाणेच आधुनिक कालखंडातील कवियत्री बहिणाबाई चौधरी मनासंबंधी म्हणतात.

मन जहरी, याचं न्यारे रे तंतर !
अरे इंचू साप बरा ! त्याले उतारा मंतर !!
मन पाखरू पाखरू त्यांची काय सांगू मात !
आता व्हतं भुईवर गेल गेल आभायात !!

अशा प्रकारे मानवी मनाचे चिंतन, स्वरूप घेण्याचा प्रयत्न युगानुयुगे सुरू आहे.

**संदर्भ सूची :**

१) जोशी का.आ. -'सकल संत गाथा' खंड पाहिला श्री संत वाङ्‌मय मंदिर, पुणे प्रथमावृत्ती १९६७
२) इनामदार हे.वि. -'संत एकनाथ दर्शन' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती १९८३
३) खंदारकर शंकर - 'तुकाराम महाराज गाथा भाष्य' प्रकाशक, गो.य.राणे सदाशिव पेठ, पुणे,द्वितीयवृत्ती १९७८
४) तुळमुळे शं.गो. - 'पाचसंत कवी' व्हिनस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती १९६२
५) जोशी मधुकर - 'सिध्द परंपरा आणि महाराष्ट्रातील संत' व्हिनस प्रकाशन, नागपूर प्रथमवृत्ती २००२.